

# जनसंपर्क विभाग

जळगाव दि.१४(प्रतिनिधी)-क्विक हेल फाउंडेशन च्या वतीने देण्यात येणाऱ्या सायबर सुरक्षा पुरस्कारात कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाला चार पुरस्कार प्राप्त झाले आहेत. पुण्यात झालेल्या एका समारंभात या पुरस्कारांचे वितरण झाले.

क्विक हेल फाउंडेशन आणि विद्यापीठातील संगणक शास्त्र प्रशाळा यांच्यात सामंजस्य करार झाला असून या करारान्वये शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये प्रशाळेच्या ३८ विद्यार्थ्यांनी सायबर सुरक्षेच्या बाबतीत जनजागृती केली. जळगाव धुळे आणि नंदुरबार जिल्ह्यातील ग्रामीण तसेच शहरी भागातील जवळपास १०० शाळा आणि महाविद्यालयांमध्ये जाऊन ४० हजार विद्यार्थ्यांमध्ये आणि दहा हजार सामान्य नागरिकांमध्ये सायबर सुरक्षेचे प्रबोधन करण्यात आले.

सायबर सुरक्षेचे प्रबोधन करण्यात आल्याबद्दल सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा अवार्ड २०२४ चे आयोजन १० फेब्रुवारी रोजी पुणे येथे करण्यात आले. या कार्यक्रमांमध्ये विद्यापीठाच्या संगणकशास्त्र प्रशाळेला विविध पुरस्कार देण्यात आले.

कुणीका खैरनार आणि दर्शना हिरे या विद्यार्थिनींना बेस्ट प्रोसेस कॉम्प्लिअन्स हा अवॉर्ड देण्यात आला तसेच गायत्री ठाकरे आणि श्रेया भोंबे या विद्यार्थिनींना बेस्ट प्रोग्राम आऊटरिच इम्पॅक्ट हा अवॉर्ड देण्यात आला.प्रशाळेतील प्रा. राजू आमले, प्रा. सुरेंद्र कापसे व प्रा.मनोज पाटील यांना बेस्ट प्रोसेस कॉम्पियन्स हा अवॉर्ड देण्यात आला. संगणकशास्त्र प्रशाला आणि विद्यापीठाला बेस्ट मीडिया अँड आऊटरिच हा अवॉर्ड देण्यात आला या कार्यक्रमास कुलगुरू प्रा.व्ही एल माहेश्वरी तसेच क्विक हेलच्या मुख्य कार्यकारी अधिकारी अनुपमा काटकर,सोलापूर विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. प्रकाश महानवार, सायबर सेलचे पोलिस अधीक्षक संजय शिंत्रे आदी उपस्थित होते.

**बातमी नं. २**

जळगाव दि.१४ ( प्रतिनिधी ) एका व्यक्तीने ठरवल्यास तो आठ जणांना जीवदान देऊ शकतो त्यासाठी नेत्रदान,त्वचा दान,अवयव दान आणि देहदान करण्याचा संकल्प करावा असे आवाहन कवयित्रीबाई बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. व्ही. एल.माहेश्वरी यांनी केले.

नेत्रदान, त्वचादान, देहदान याबाबत फेडरेशन ऑफ ऑर्गन अ‍ॅण्ड बॉडी डोनेशन मुंबई, या सामाजिक संस्थेतर्फे जनप्रबोधन करणारी रथयात्रा मंगळवार दि. १३ फेब्रुवारी रोजी कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात आली. या निमित्त आजीवन अध्ययन व विस्तार विभाग आणि इंडियन रेडक्रॉस सोसायटी जळगाव यांच्या वतीने आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. नाशिक ते आनंदवन अशी १४३० कि.मी. ची ही रथयात्रा आयोजित करण्यात आली आहे. प्रा माहेश्वरी आपल्या भाषणात म्हणाले की, आज कोणतेही विज्ञान कृत्रिम रक्त बनवू शकत नाही.रक्त हे फक्त मानवच दान करू शकतो त्यामुळे प्रत्येकाने रक्तदान करण्यासाठी पुढाकार घ्यावा.

या कार्यक्रमात अध्यक्ष पुरुषोत्तम पवार यांनी संस्थेच्या कामाची माहिती दिली. इंडियन रेडक्रॉस सोसायटी जळगावचे अध्यक्ष डॉ. विनोद बियाणी, उपाध्यक्ष डॉ. गणी मेमन आणि डॉ. प्रसन्नकुमार रेदासनी यावेळी उपस्थित होते.यावेळी त्यांनीही मनोगत व्यक्त केले. इंडियन रेडक्रॉस सोसायटी जळगावच्या वतीने देहदान करण्यासाठी भरावयाच्या अर्जाचे अनावरण करण्यात आले. विभागाचे संचालक प्रा. आशुतोष पाटील यांनी प्रास्ताविक केले. या

॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon
'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

## जनसंपर्क विभाग

समारंभात देहदान, अवयवदान, नेत्रदान केलेल्या व्यक्तीच्या परिवाराचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन सुभाष पवार यांनी केले. उज्ज्वला वर्मा यांनी आभार मानले.

…………………………………………………………………………………………………………

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२४ दिनांक: १४ फेब्रुवारी, २०२४

प्रति,
मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी